(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

[१९९७] १ एस. सी. आर. १०१३

**स्टेट ऑफ केरला**

*- विरुद्ध -*

**मदर एनास्थेसिया, सुपेरिअर जनरल अँड अदर्स**

६ फेब्रुवारी, १९९७

[के. रामास्वामी आणि एस. सागीर अहमद, न्यायमूर्ती]

*सेवा कायदाः*

*कालीकट विद्यापीठ अधिनियम, १९७५:*

*कलम ५७(१), (४) आणि (६) - अधीव्याख्याते - नियुक्तीसाठी अधिमान्य दावा- केवळ पद किंवा अभ्यासक्रमाच्या रद्द केल्यामुळे किंवा अशाच प्रकारच्या परिस्थितीमुळे कार्यमुक्त केलेले अधिव्याख्यातेच करू शकतात - रजामुक्ती रिक्त पदावर असलेल्या तात्पुरत्या शिक्षकाला अशा प्रकारे कार्यमुक्त कर्मचारी मानले जाऊ शकत नाही - म्हणून ती अधिमान्यतेचा दावा करू शकत नाही.*

दिवाणी अपील अधिकारिता : दिवाणी अपील क्र. ६७६८-६९/१९८३.

ओ. पी. क्र. ८६८/७७-सी व ४९३४/१९७६- डी मधील केरळ उच्च न्यायालयाने दि. १९/०८/८० रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

अपीलकर्त्यासाठी एम. टी. जॉर्ज.

उत्तरवादींसाठी के. एम. के. नायरसाठी जोसेफ पैकाडा आणि एम. ए. फिरोज (एन. पी.).

न्यायालयाचा न्यायनिर्णय पुढीलप्रमाणे देण्यात आला :

ह्या अपीला विशेष अनुज्ञेद्वारे ओ. पी. क्र. ८६८/७७-सी व ४९३४/१९७६- डी मधील केरळ उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिलेल्या न्यायनिर्णयावरून उद्भवल्या आहेत.

कबूल केलेली स्थिती अशी आहे की श्रीमती. मेरी लिली, तिसरी उत्तरवादी, दि. २ जानेवारी १९७४ पासून सेंट जोसेफ कॉलेज फॉर वुमन, इरिनजलकुडा येथे तीन महिन्यांच्या कालावधीसाठी रजामुक्ती रिक्त पदावर नियुक्त करण्यात आली होती.

कालावधी संपल्यानंतर ती अधिव्याख्याता म्हणून काम करणे समाप्त झाले. १९७६ मध्ये, जेव्हा कायम रिक्त पद तयार झाले होते, तेव्हा भरतीसाठी जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार, जेव्हा तिसऱ्या उत्तरवादीसह २७ उमेदवारांनी अर्ज केला होता आणि त्यांना निवडीसाठी बोलावण्यात आले होते, तेव्हा श्रीमती मरियमम चाको, चौथ्या उत्तरवादी यांची निवड करण्यात आली. तिसऱ्या उत्तरवादीने श्रीमती मरियम्म च्या निवडीच्या आणि नियुक्तीच्या वैधतेस कालीकट विद्यापीठ अधिनियम, १९७५ च्या कलम ५७ (६) खाली, ती नोकरीतून कार्यमुक्त केलेली कर्मचारी असल्याने तिच्याकडे नियुक्तीसाठी अधिमान्यतेचा दावा होता, या आधारावर आव्हान दिले. कलम ५७ चे उप-कलम (६) खालीलप्रमाणे आहेः

> "उपकलम (i) आणि (४) मध्ये काहीही असले तरी, दि.१४ मार्च १९७४ रोजी किंवा त्यानंतर, त्या खाजगी महाविद्यालयातील अभ्यासक्रम रद्द झाल्यामुळे किंवा शिस्तभंगाची कारवाई वगळता इतर कोणत्याही कारणास्तव खाजगी महाविद्यालयातून कार्यमुक्त करण्यात आलेल्या शिक्षकाला, भविष्यात खाजगी महाविद्यालयात किंवा, यथास्थिती, विद्यापीठ क्षेत्रातील शैक्षणिक संस्थेच्या कर्मचारी व्यवस्थापनाखालील कोणत्याही खाजगी महाविद्यालयात होणाऱ्या नेमणुकीच्या बाबतीत संदर्भ दिला जाईल." (भर देण्यात आला)

त्याचे वाचन असे सूचित करेल की उपकलम (i) आणि (४) मध्ये काहीही असले तरी, दि.१४ मार्च १९७४ रोजी किंवा त्यानंतर, त्या खाजगी महाविद्यालयातील अभ्यासक्रम रद्द झाल्यामुळे किंवा शिस्तभंगाची कारवाई वगळता इतर कोणत्याही कारणास्तव खाजगी महाविद्यालयातून कार्यमुक्त करण्यात आलेल्या शिक्षकाला, भविष्यात खाजगी महाविद्यालयात किंवा, यथास्थिती, विद्यापीठ क्षेत्रातील शैक्षणिक संस्थेच्या कर्मचारी व्यवस्थापनाखालील कोणत्याही खाजगी महाविद्यालयात होणाऱ्या नेमणुकीच्या बाबतीत संदर्भ दिला जाईल. कबूल आहे की, तिसऱ्या उत्तरवादीची नियुक्ती तीन महिन्यांच्या अल्प कालावधीसाठी रजसमुक्तीच्या रिक्त पदावर करण्यात आली होती. उपकलम (६) चा हेतू केवळ असा दिसून येतो की जेव्हा नियमितपणे नियुक्त केलेल्या शिक्षकाला किंवा स्थायी शिक्षकाला त्या महाविद्यालयातील अभ्यासक्रम रद्द झाल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणास्तव, स्पष्टपणे, शिस्तभंगाची कारवाई

व्यतिरिक्त इतर तत्सम कारणांमुळे सेवेतून कार्यमुक्त केले जाते, तेव्हा अशा पदावर असलेल्या शिक्षकाला भविष्यातील नियुक्तीसाठी अधिमान्य वागणूक दिले जाते. रजमुक्त रिक्त पदावर असलेल्या तात्पुरत्या शिक्षकाला कार्यमुक्त केलेले मानले जाऊ शकत नाही किंवा कार्यमुक्त कर्मचारी म्हणून दर्जा दिला जाऊ शकत नाही. पद किंवा अभ्यासक्रम रद्द झाल्यामुळे किंवा अशा तत्सम परिस्थितींमुळे गैरवर्तनामुळे कार्यमुक्त वगळता इतर कोणत्याही कारणासाठी कार्यमुक्त म्हणून सूचित होईल. केवळ असा शिक्षक नियुक्तीसाठी अधिमान्यतेचा दावा करण्यासाठी पात्र असेल, परंतु ज्या शिक्षकाची नियुक्ती मर्यादित कालावधीसाठी रजामुक्त रिक्त पदावर झाली आहे, अशा शिक्षकाला अधिमान्यतेचा दावा करता येणार नाही.

त्यानुसार याचिका निकाली काढण्यात आल्या. वादखर्च बसविण्यात आला नाही.

जी. एन.

अपील निकाली काढण्यात आल्या.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी वैध मानला जाईल."